# वालचंद शिक्षण समूहाची ‘संस्कारक्षम’ परंपरा - धन्यकुमार शहा

## मुलांचे वस्तीगृह भूमीपूजन थाटात

सोलापूर

श्री. ऐल्लक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाला संचलित वालचंद शिक्षण समूहाची शैक्षणिक गुरूकुल पध्दतीचा वारसा महान आहे, अशा शब्दात संस्थेचा गौरव विजापूर येथील इंडीचे सहस्त्रपाणी १००८ पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर ट्रस्टचे कार्याध्यक्ष धन्यकुमार शहा यांनी केला आहे.

अशोक चोक येथील मुलांसाठी नियोजित वसतीगृहाच्या पायाभरणी दस-याच्या मूहुर्तावर शहा यांच्या हस्ते भूमीपूजन समारंभ थाटात पार पडले, याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ‘ऐ.प.दि.जैन पाठशाला’चे अध्यक्ष श्रीमंत शेठ अरविंद दोशी होते. सौ. प्रतिभा दोशी यांची विशेष उपस्थिती होती.

धन्यकुमार शहा पुढे म्हणाले, संस्थेचा हा शतकोत्तर प्रवासातील महत्वाचा टप्पा मानला पाहीजे. १८८५ मध्ये सुरू केलेल्या या गुरूगुरूकुल पध्दतीचा वारसा कायम टिकवत २१ व्याशतकाला जुळवून घेणारी आधुनिक वास्तू होत आहे. तंत्रज्ञान युगात विद्यार्थ्यांची झेप जगाला कवेत घेणारी असते, ती असली पाहिजे. त्याच बरोबर त्यांना भारतीय सांस्कृतीच्या जाणीवा सतत करून देण्यासाठी रोज कार्यक्रम राबविण्याची गरज आहे. मुल्यशिक्षणाला जोड देत नितीपाठशालेचा परिपाठ गिरवणे, चारित्र्य समृध्द जीवन कला अवगत करण्याचे संशोधन शिक्षकांनी करावे, असे आवाहन शहा यांनी केले.

भूमीपूजन समारंभात संस्थेचे विश्वस्त गजकुमार शहा, दिपक शहा, कांतीलाल शहा, संजीव पाटील, प्रकाश वेद, प्रभाचंद शास्त्री, प्रा. अनिल आरगिध्दी, प्रा. अनिल अंकुलकर, समाजशास्त्र विभगाचे प्रा. चित्तरंजन जोशी, संस्थेचे खजिनदार भूषण शहा, पराग शहा आणि संस्थेचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी त्यांच्या सुविद्य पत्नी माया गांधी व चिमुरडी नात किमया वैभव गांधी यांनी प्रतिकात्मक कुदळ मारून पायाभरणी के ली.याप्रसंगी श्रीमती लिलावती गांधी, विक्रम गांधी, पृथ्वी गांधी, वैभव गांधी, ब्रिजेश गांधी उपस्थित होते. प्रारंभी वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजीचे प्राचार्य डॉ. शशीकांत हकलुडे यांनी प्रस्ताविकेत, संस्थेच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेतला. १८८५ पासून गुरूकुल शिक्षण पध्दतीची परंपरा आजही संस्थेने काळानुरूप बदल करीत कायम टिकवले आहे. नियोजीत मुलांचे वस्तीगृह सात मजली असून पहिल्या टप्प्यात चार मजली इमारत बांधकाम पूर्ण होईल. त्यामध्ये 200 खोल्या असतील. दोन विद्यार्थ्यांमागे एक खोली याप्रमाणे ४०० विद्यार्थ्यांची येथे सोय होणार आहे. दोन्ही बाजूने स्वच्छ प्रकाश, हवा आणि प्रत्येक खोलीस अटॅच टॉयलेट-बाथरूम, अंघोळीसाठी गरम पाण्याची सोय, वस्तीगृहाचे प्रांगण ‘वाय-फाय’ने जोडल्याने २४ तास इंटरनेट सेवा, स्वतंत्र मेस आणि जिमनॅशियमची सोय करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. यावेळी संस्थेच्या विविध विभगाचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, समाजातील प्रतिष्ठीत व्यक्ती मोठ्याप्रमाणात उपस्थित होते.